# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

## अपील क्र. १३२६/नाग/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुनिल कुमार गयाप्रसाद मिश्रा<br>सेंट्रल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ मास कम्युनिकेशन<br>व्ही आया पी रोड, धरमपेठ, नागपूर -४४० ०१० | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (मागासवर्गीय कक्ष)<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/१०/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १८/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १४/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सहा कुलसचिव प्रशासन व माहिती अधिकारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे पुढीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आपण दिनांक १७/०२/२०१० ला दिलेल्या माहिती नुसार विद्यापीठ कार्यरत मागासवर्गीय शिक्षकांचे जाती पडताळणी प्रमाणपत्राची प्रत द्यावी.

तसेच आपण दिनांक १७/०२/२०१० ला दिलेल्या माहिती नुसार विद्यापिठात कार्यरत प्रथमश्रेणी मागासवर्गीय अधिकारी यांचे जाती पडताळणी प्रमाणपत्राची प्रत द्यावी.

तसेच मागासवर्गीय कर्मचारी यांचे जाती पडताळणी प्रमाणपत्र न तपासता पदोन्नती देण्यात आली आहे त्यांची यादी.

सदर माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. १३/०७/२०१० च्या पत्रान्वये मागासवर्गीय शिक्षक व अधिकाऱ्यांची जाती पडताळणी प्रमाणपत्रे संबंधितांची अनुमती प्राप्त केल्यानंतरच पुरविता येईल. व ही यादी कोणत्या तारखेपासून द्यावयाची आहे याबाबत खुलासा व्हावा जेणेकरुन अचुक माहिती पुरविता येईल अशी माहिती पुरविलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१/०७/२०१० रोजी देण्यात आला असून मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने देण्यात आली असून जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यास संमती दर्शविलेली आहे/ नाही. अशा दोन्ही प्रकारच्या त्रयस्थ पक्षांचे उपरोक्त प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती अर्जकर्त्यास आस्थापना विभागाने मा कुलसचिवांचे आदेश घेवून निर्णयाच्या दिनांकापासून सात दिवसांचे आत पुरविण्यात याव्यात असा निर्णय देण्यात आला व सदर अपील निकाली काढण्यात आले. परंतू दि.२४/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर प्रत्येक व्यक्तीच्या वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत देण्याची आवश्यकता नाही मात्र यादी व सोबत क्रमांक उपलब्ध करुन दिलेला आहे असे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव यांनी अपीलकर्तास कळविले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्रयस्थ पक्षाची माहिती असली तरी ती गोपनीय माहिती नाही जात प्रमाणपत्र किंवा जात वैधता प्रमाणपत्र हे सार्वजनिक अभिलेखे आहे ज्या आधारावर आरक्षण मिळते

तेच प्रमाणपत्र हे गोपनीय असू शकत नाही. किंवा वैयक्तिक आहे म्हणून उपलब्ध करुन देणे योग्य नाही त्यामुळे त्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती मिळण्याची आवश्यकता आहे त्याकरिता अपीलकर्ता हे खर्च भरण्यास तयार आहेत असे त्यांनी युक्तिवादात सांगितले. पदोन्नती च्या संदर्भात त्यांना कालावधी दिलेला नाही. त्यामुळे त्यांना पदोन्नती दिली याची यादी व जे कर्मचारी सध्या कार्यरत आहेत त्यांच्या प्रमाणपत्रांची व कागदपत्रांची माहिती मिळणे आवश्यक आहे, त्याकरीता ते खर्च भरण्यास तयार आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

१. संबंधित प्रमाणपत्रे ही या कार्यालयाची प्रमाणपत्रे नसून त्रयस्थ पक्षांसंबंधित होती. तसेच सर्व मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची असल्यामुळे प्रशासकिय प्रमुख म्हणून मा. कुलसचिवांचे याबाबत आदेश घेण्यात आले. त्यावर सर्व संबंधितांना पत्र पाठवून त्यांची वैधता प्रमाणपत्रे श्री मिश्रा यांना पुरविण्याबाबत अनुमती घेऊन ती देण्याचे आदेश होते. त्यानुसार या कार्यालयाने संबंधित शिक्षक व अधिकाऱ्यांना दिनांक १५ जुलै २०१० रोजी पत्र पाठवून प्रमाणपत्रे पुरविण्याबाबत अनुमती मागितली व तसे श्री मिश्रा यांना दिनांक १३ जुलै २०१० रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आले.

२. यावर श्री मिश्रा यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज केला या अर्जाच्या संदर्भात दिनांक ३१ जुलै २०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या झालेल्या निर्णयानुसार त्रयस्थ पक्षांनी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यास संमती दर्शविलेली आहे/ नाही. अशा दोन्ही प्रकारच्या त्रयस्थ पक्षांचे उपरोक्त प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती अर्जकर्त्यास आस्थापना विभागाने मा. कुलसचिवांचे आदेश घेऊन निर्णयाच्या दिनांकापासून सात दिवसांचे आत पुरविण्याबाबत निर्णय दिला.

३. दिनांक १५ जुलै, २०१० च्या पत्रानुसार संबंधित शिक्षक व अधिकाऱ्यांनी श्री मिश्रा हे कुख्यात अपराधी असून नागपूर विद्यापिठातील बनावट गुणपत्रिका व गुणवाढ प्रकरणात मा. उच्च न्यायालयाने त्यांना शिक्षा ठोठावली आहे. वैधानिक दस्तावेज बनावट करण्याच्या प्रकरणात शिक्षा झालेल्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीला जाती वैधता प्रमाणपत्र पुरविल्यास त्यांच्या हिताच्या विरुध्द दुरुपयोग करण्याची दाट शक्यता असल्यामुळे ही प्रमाणपत्रे त्यांना पुरविण्यात येऊ नये असे बहुतांश शिक्षक व अधिकाऱ्यांनी कळविले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक ३१ जुलै २०१० रोजीच्या निर्णयानुसार सदर प्रकरण त्रयस्थ पक्ष संबंधित शिक्षक व प्रथम श्रेणी अधिकारी यांनी त्यांची प्रमाणपत्रे देण्याबाबत दिलेल्या अभिप्रायासह प्रशासकिय

प्रमुख मा. कुलसचिवांना दि. ३ ऑगस्ट २०१० रोजी सादर करण्यात आले. यावर आस्थापना विभागात उपलब्ध माहिती संकलित करुन अर्जदाराला कळवावी, प्रत्येक व्यक्तीच्याबाबत प्राप्त सर्टिफिकेटची माहिती पुरविणे माहिती दिल्यानंतर आवश्यक नाही. असे कुलसचिवांनी आदेश दिले.

५. त्यानुसार या कार्यालयाने सर्व कार्यरत मागासवर्गीय शिक्षक व प्रथम श्रेणी अधिकारी यांच्याबाबत माहिती श्री सुनिल कुमार मिश्रा यांना दिनांक २४ ऑगस्ट २०१० रोजी कळविलेली आहे.

६. श्री सुनिल मिश्रा त्यांच्या अपीलात कुलसचिव यांनी अधिकार नसतांना हस्तक्षेप केल्याच्या संदर्भात सादर करण्यात येते की, सदर प्रकरणी कुलसचिवांनी हस्तक्षेप केलेला नाही. विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात प्रशासकिय प्रमुख म्हणून ते सक्षम अधिकारी असून त्यांच्या परवानगी शिवाय कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक नस्तीतून त्यांची वैयक्तिक संबंधात कोणतेही दस्तावेज अन्य व्यक्तीस पुरविण्याबाबत नियमानुसार त्यांच्या आदेशाची आवश्यकता राहते व त्यानुसार आदेश घेण्यात आलेले आहे.

७. श्री मिश्रा यांचा विद्यापिठात कार्यरत वित्त अधिकारी व डॉ. आंबेडकर विचारधारांचे विभागप्रमुख व अन्य अधिकारी यांच्याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही असा आक्षेप आहे. या संदर्भात नमूद करण्यात येते की, विद्यापीठातील वित्त व लेखा अधिकारी हे एकाकी सावधी नियुक्तीचे खुल्या प्रवर्गातील पद आहे. त्यामुळे या पदावर झालेली नियुक्ती ही मागासवर्गीय प्रवर्गाच्या उमेदवारातून झालेली नसल्यामुळे त्याची माहिती देण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही. कारण श्री मिश्रा यांनी कार्यरत मागासवर्गीय अधिकाऱ्यांची माहिती मागितली आहे.

८. तसेच नमूद करण्यात येते की, आंबेडकर विचारधारा प्रमुख हे मुळात शासनमान्य पद नाही. या पदावर सरळसेवेने किंवा पदोन्नतीने नियुक्ती होत नसल्यामुळे आरक्षणाचा प्रश्न उद्‌भवत नाही. आंबेडकर विचारधारा विभागात एकच अधिव्याख्याताचे पद मंजूर असून हे सरळसेवा भरतीचे खुल्या प्रवर्गाचे पद आहे त्यामुळे या पदावर देखील नियुक्ती मागासवर्गीयांमधून झालेली नाही.

९. श्री मिश्रा यांना कार्यरत मागासवर्गीय शिक्षक व प्रथम श्रेणी अधिकारी यांची माहिती देण्यात आलेली आहे. फक्त संबंधीतांची प्रमाणपत्रे आदेशानुसार देण्यात आलेली नाही.

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार कार्यवाही घेऊन जनमाहिती अधिकारी व सहाय्यक कुलसचिव (आस्थापना) यांनी अर्जकर्त्यास त्यांच्या दिनांक १४.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जाची योग्य ती दखल

घेऊन विहीत कालावधीमध्ये उपलब्ध माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच अर्जात नमूद मुद्यांबाबत वस्तुस्थिती ही कळविलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपकुलसचिव (विशेष मागासवर्गीय कक्ष) यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करुन पूर्ण सहकार्य करण्यात आलेले आहे. त्यामुळे विनंती करण्यात येते की, कृपया अपीलार्थी / अर्जदार श्री सुनिल मिश्रा यांचे आपणासमक्ष सादर झालेले अपील खारीज करण्यात यावे.

परंतु अधिनियमाचे कलम १९ (४) प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यास आयोगाने त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्याने त्या त्रयस्थपक्षास जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे ३० नोव्हेंबर २०१० रोजी उपस्थित राहण्याचे कळविणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्रयस्थपक्षांना अयोगाचे निर्णयाबाबत अवगत करुन दि.३०/११/२०१० रोजी आयोगापुढे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित करावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३१३/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अनिल शंकरराव अंबुसकर<br>रा. नांदुरा वार्ड क्र. २, खरेदी विक्री संघामागे<br>ता. नांदुरा जि. बुलढाणा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. १२/०४/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याने खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१,२,३,४,५ राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य तक्रार क्रमांक २००९/४३१६७/ त.क्र. ५६७/ कार्या. राज्यमाहिती आयोग मुंबई दि. १४ ऑक्टोबर २००९ तक्रार दि. २०/०८/०५ यांनी उपसचिव राज्य माहिती आयोग

नागपूर, खंडपीठ नागपूर यांना दिलेल्या मुळ अर्ज सहपत्रांसह पुढील कार्यवाहीसाठी आपणाकडे त्वरीत हस्तांतरीत केल्याबाबत कार्यवाहीची माहिती देण्यात यावी.



१) वरील विषयाबाबत आपण आपले स्तरावरुन केलेल्या कार्यवाहीचे अहवालाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. (सत्यप्रत सोबत जोडले आहे).

२) संग्रामपूर पंचायत समिती कार्यालय अपील क्रं. ७०८/२००७ ची कार्यवाही श्री आरपी मारोडकर गटविकास अधिकारी सध्या कार्यरत धरणगांव पं.स. जिल्हा जळगाव खानदेश यांचे शिस्तभंगाची कार्यवाहीचे अहवाल आयोगास अद्याप प्राप्त झाले किंवा नाही त्याबाबत कार्यवाही व माहिती देण्यात यावी.

३) अपील क्र. ७०८/२००७ दि. २२/१०/२००८ चे आदेशान्वये शासनाने श्री आर. बी. मारोडकर गटविकास अधिकारी सध्या कार्यरत पंचायत समिती कार्यालय धरणगाव जि. जळगाव खानदेश यांचेवर शासनाने कार्यवाही करुन तसा अहवाल मा. राज्य माहिती आयोगास देण्यात (सादर) करण्यात आला असेल त्या कार्यवाहीची प्रत देण्यात यावी किंवा आयोगाकडून देण्याची कृपा करुन या अपील क्र. ७०८ बाबत कार्यवाहीची व अहवालाची सत्यप्रतीसह माहिती देण्यात यावी.

४) राज्य माहिती आयोगाने २२/१०/२००८ रोजी आदेश पारित केल्यानंतर श्री आर पी मारोडकर गटविकास अधिकारी यांचेवर शासनाने कोणत्या कालावधीत कार्यवाही करण्यात आली त्या कार्यवाहीची नोंदणी शासनाकडे करण्यात आली त्याची नोंदणी केलेल्या कार्यवाहीची सत्यप्रतीसह (शासनाकडून आयोगामार्फत) माहिती सविस्तर देण्यात यावी.

५) संबंधीतांनी गेल्या २२/१०/२००८ चे आदेशाची अमंलबजावणीस विलंब झाला (करण्यात आला) त्याबद्यल आयोगाने त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीचे सविस्तर अहवालाबाबत माहिती देण्यात यावी (सत्यप्रतीसह).

वरीलप्रमाणे माहिती मागितलेली असून माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. २१/०८/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविली आहे त्यात दि.२०/०८/२००९ रोजीचा तक्रार अर्ज उपलब्ध झाला नसल्याचे कळविले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी पंचायत समिती कार्यालय संग्रामपूर, जि बुलढाणा यांचेकडून खुलासा मागविण्यात आला आहे असा स्पष्ट उल्लेख करुन अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. तरीसुध्दा विहित

मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २१/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा



निर्णय दि.०९/०८/२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांना दि. २०/०८/२००९ ची तक्रार आणि दि.१२/०४/२०१० च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही ३ दिवसांचे आत अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरवावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि.२१/०८/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दि.२०/०८/२००९ रोजी केलेली तक्रार या कार्यालयात आढळून येत नाही. त्यामुळे तक्रारीची प्रत ही अपीलकर्ता यांचेकडूनच मागविण्यात आली. त्यानंतर अपीलात दिलेल्या निर्णयाची व तक्रारीच्या संदर्भामध्ये संबंधीत पंचायत समिती यांचेकडूनच खुलासा मागविला व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. राज्य माहिती आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात संबंधीत विभागाने निर्णयाची अमंलबजावणी करावयाची आहे. त्याबाबत आयोगाचे कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही अपेक्षीत नाही अशी तरतुदही माहिती अधिकार २००५ च्या अधिनियमात नाही. त्यामुळे वास्तविक अपीलकर्ता यांनी आयोगाचे निर्णयावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली त्याबाबत त्याच कार्यालयाकडे विचारणा करणे संयुक्तिक असते. प्रत्येक निर्णयाच्या बद्यल आयोगाचे कार्यालयाने पुन्हा सर्व माहिती अधिकाऱ्यांना व सर्व संबंधीतांना कार्यवाहीच्या बद्यल विचारणे सर्वस्वी अशक्य आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षीत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी केलेली तक्रारही आढळून आली नाही परंतू त्यांनी तक्रारीची प्रत मुदतीतच मागितली आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. राज्य माहिती आयुक्तांचा निर्णय हा आयोगाचाच निर्णय आहे. व मुख्य माहिती आयुक्त हे राज्य माहिती आयुक्तांच्या निर्णया संदर्भात चौकशी करणारे आयुक्त नाही. त्यामुळे त्यांच्याकडे तक्रार करुन सुध्दा कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही. दुर्देवाने अपीलकर्ता यांना अधिनियमांच्या तरतुदींची माहिती नसल्यामुळे अशाप्रकारचे निरर्थक अर्ज व तक्रारी ते करीत असतात. त्यामुळे आयोगाचे कामकाजात विनाकारण वाढ होत असते. व खऱ्या अर्थाने ज्यांना माहितीची गरज असते त्यांच्या प्रकरणास विलंब होतो. तसेच राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात अनेक अपीलांच्या किंवा निर्णयाच्या, तक्रारींच्या

संदर्भात माहितीच्या अधिकारात माहिती मागितली जाते त्यामुळे आयोगाचे प्रशासकीय कामकाजाचे संदर्भात विलंब होत असतो. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**..४..**

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३२२/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राधेश्याम परसरामजी काबरा<br>शिवाजी वार्ड, मु. पो. देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली - ४४१२०७ | - | **अपीलकर्ता** |
| | **विरुध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक ११/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार देसाईगंज गडचिरोली यांना दि. ०४/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी तहसिलदार यांना दिलेल्या अर्जासंबंधाने एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३.   सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१३/०४/२०१० ला अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी एकूण ८ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतला आहे. मुद्या क्र. २ अन्वये टिपणीची प्रत मिळाली नाही मुद्या क्र. ३ अन्वये आवक नोंदवही ची माहिती प्राप्त झाली नाही. मुद्या क्र. ७ अन्वये आपले दि. ५ एप्रिल २०१० चे पत्र प्राप्त झाले परंतू अपूर्ण व टाळाटाळ करणारी माहिती प्राप्त झाली. आपले कार्यालय श्री जेसामल मोटवानी यांना संरक्षण देत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. अर्जदारास कोणत्या जोडपत्र अ नुसार माहिती पुरविली याचा देखील उल्लेख नाही. हस्ते श्री ईश्वर चातूर अशी पोच दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.११/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०७/०६/२०१० रोजी देण्यात आला असून त्यात अपीलकर्ता सुनावणीस हजर राहिले नाही त्यामुळे अपील फेटाळण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.   अपीलकर्ता गैरहजर आहेत परंतू जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता हे माहितीचा अर्ज करतात परंतू स्वतः माहिती घेण्याकरीता केव्हाही हजर राहत नाही व त्यांच्या हस्तकांतर्फे माहिती घेण्याची कार्यवाही करतात. प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहत नाही. आयोगाचा सुध्दा अनुभव असा आहे की, अपीलार्थी आयोगाच्या सुध्दा कोणत्याही सुनावणीस उपस्थित राहत नाही. तरीही त्यांची अपीले त्यांच्या सुनावणीच्या अनुपस्थितीत सुध्दा खारीज केली जात नाहीत. जी अपीले खारीज केली आहेत ती गुणवत्तेनुसार खारीज केली आहेत. वास्तवीक अपीलकर्ता यांना कोणती माहिती उपलब्ध झाली नाही याबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक होते. परंतू त्यांच्या द्वितीय अपील मेमो मध्ये अर्धवट, बोध न होणारी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती अशा पध्दतीचे वर्णन आहे. दुसरे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी दिलेले नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे तीच माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी लेखी हरकत घेतली असल्याने अपीलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात

उपलब्ध असलेली माहिती पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.



## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी माहिती स्विकार करतांना घेतलेल्या हरकतेच्या मर्यादेत पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३२४/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री बी. डी. मडावी<br>मु. सावरगांव, पो. चातगांव<br>ता. जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १८/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर असून त्यांच्या तर्फे सहाय्यक (प्राथमिक शाळा) श्री अशोक वनकर जि. प. गडचिरोली हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि.३०/०६/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे दि. ०७/०४/२००९ ते २९/०६/२०१० च्या कालावधीतील मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांचे आदेश क्रमांक जिपग/शि वि/स्था -१/४६३-६९/०९



दि.२९/०५/२००९ नुसार निलंबन पूर्वीचा चौकशी अहवाल व निलंबनानंतरची चौकशी तथा निर्णयाची सांक्षाकित प्रती , २) दि. २२/०२/२०१० च्या निवेदनानुसार सेवेत पुर्नस्थापना व निलंबन काळातील निर्वाह भत्ता नियमाप्रमाणे देण्याबाबत काय कार्यवाही केली याबाबतची सुध्दा माहिती मिळण्यात यावी . याप्रकारची माहिती मागितलेली असून माहिती स्वतः घेवून जाणार असे नमूद केले आहे.

३.	अपीलकर्ता यांच्या ३०/०६/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद गडचिरोली यांनी दि. १६/०७/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहितीचा अतिरिक्त खर्च रुपये ९०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. २७/०७/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.०५/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता हजर झाले नाही त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी होवू शकली नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती दिली आहे ती माहिती अपूर्ण आहे व चुकीची, दिशाभूल करणारी आहे. अपीलकर्ता यांनी निलंबनापूर्वीचा चौकशी अहवाल व निलंबनानंतरची चौकशीची प्रत तथा निर्णयाची साक्षांकित प्रत मागितली होती. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, निलंबनापूर्वी कोणतीही चौकशी होवू शकली नाही. परंतू ज्या कारणाने निलंबन झाले आहे त्याबाबतचा चौकशी अहवाल आहे व तो त्यांना उपलब्ध करुन दिला आहे. आदेशामध्ये सुध्दा सकृतदर्शनी असे शब्द वापरले आहेत त्यामुळे निलंबनापूर्वी कोणतीही चौकशी झाली नाही. फौजदारी गुन्हा झाला असल्यामुळे व अटक झालेली असल्याने कोणती चौकशी झाली आहे व निलंबनानंतर कोणती चौकशी झाली नाही.

त्यामुळे निर्णय दिलेला नाही या संदर्भात कोणतीच चौकशी होवू शकत नाही, असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांचेविरुध्द कोर्टात सुध्दा कार्यवाही सुरु असल्याने व त्यामुळे निलंबन काळातील निर्बंध असल्याने त्यांचेविरुध्द  निर्णय घेता आला नाही. तसेच २०१० मध्ये यासंबंधित अपीलकर्ता यांचे  कोणतेही निवेदन प्राप्त झाले नाही.

**..३..**

यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३२३/नाग/२०१०**

१. श्री उमेश गोंडू भारशंकर - **अपीलकर्ता**
C/o, श्री श्रावण दुर्गे, मु. पो. अहेरी, धरमपुरी वार्ड क्र.४,
ता. अहेरी जि. गडचिरोली

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी - **उत्तरवादी**
एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प, अहेरी
ता. अहेरी जि. गडचिरोली

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक - **उत्तरवादी**
शासकिय माध्यमिक आश्रम शाळा, देचलिपेठा
ता. अहेरी जि. गडचिरोली

**(आदेश पारित दिनांक ०४/१०/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १८/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांचेतर्फे श्री आर. चांदुरकर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शासकिय माध्यमिक आश्रम शाळा देचलिपेठा गडचिरोली यांचेकडे कु. उषा केशव बारसागडे हिचे सत्र २००६-०७, २००७-०८,

२००८-०९, २००९-१० करिता तासिका शिक्षिका शिकवणी करिता केलेल्या अर्जाचे साक्षांकित प्रति, तसेच श्री टिकाराम बी मेश्राम स्वयंपाकी, यांचे कुंटुंबाचे शासनाकडे जमा केलेले एकत्रित पतीपत्नीचे फोटोची साक्षांकित प्रत, व या दोघांचीही ओळख दर्शविणारी माहिती व कु. उषा केशव बारसागडे हिची तासिका शिकवणीकरीता शिक्षिका म्हणून नियुक्ती करतांना जोडलेल्या कागदपत्रांच्या पुराव्याच्या साक्षांकित प्रती व टी. बी. मेश्राम यांचे मूळ सेवापुस्तिकेची वारसानं बाबतचे नोंदीची साक्षांकित प्रत मिळणेबाबतची माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २९/०६/२०१० ला मुख्याध्यापक तथा शासकिय माहिती अधिकारी शासकिय माध्यमिक आश्रम शाळा देचलिपेठा तह. अहेरी जि. गडचिरोली यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती निदर्शनास आलेली नसून श्री टि. बी. मेश्राम स्वयंपाकी हे त्यांची मूळ आस्थापना शासकिय माध्यमिक शाळा आस्थापना शाखा मूलचेरा येथून प्रकल्प कार्यालय अहेरी येथून मागविण्याचे करावे असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि.२४/०७/२०१० रोजी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलीय अधिकारी उपस्थित झाले नाही म्हणून दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना दि.०७/०७/२०१० व १८/०८/२०१० ला जी माहिती उपलब्ध आहे ती तशीच उपलब्ध आहे वगैरे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, कु. उषा केशव बारसागडे हिचे सत्र २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१० च्या परिक्षेच्या कालावधीची माहिती मागितली होती. कु. उषा केशव बारसागडे ह्या देचलीपेठा येथे कार्यरत होत्या व स्वयंपाकी श्री टी. बी. मेश्राम हे सुध्दा त्याच आश्रमशाळेत होते. म्हणून त्यांचेकडील माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते.

४. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, हे दोघेही त्यांचे आश्रम शाळेत नाहीत. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे मागच्या वर्षी पर्यंत देचलीपेठा या आश्रम शाळेतच ते दोघेही कार्यरत होते. माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी त्यांचेकडील उपलब्ध असलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले



असते. परंतू त्यांना कोणतीच माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता हजर नाहीत म्हणून अपील खारीज करणे योग्य नाही असे अधिनियमाचे कलम १९ (५) अन्वये माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी माहिती अधिकारी यांची आहे. त्यामुळे अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांना विचारणे बंधनकारक असते. अपील खारीज करणे हा त्यावरील उपाय नाही. असे असल्याने जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रकल्प अधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि.३१/०५/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जी काही माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्ता यांना छायांकित प्रतींच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रकल्प अधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

३.	अपीलकर्ता यांच्या दि. ३१/०५/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी २० दिवसात अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये १०००/- ची शास्ती



लादण्यात येते. सदर शास्तीची वसूली त्यांचे दरमहाचे वेतनातून करण्यात येवून ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करण्यात यावी.

४.	सदर निर्णयाची एक प्रत प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावी.

५.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३२९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अर्जुन मोना कोटांगले<br>मु. विहीरगांव (कन्हाळया) पोस्ट-भूगाव (मेंढा)<br>ता. लाखनी जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पोलरीस अधिक्षक भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा निमंत्रक /पोलीस पाटील<br>महात्मा गांधी तंटामुक्त गांव समिती, विहीरगांव (कन्हाळया)<br>ता. लाखनी जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/१०/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांचेतर्फे पोलीस उपनिरिक्षक श्री आर. एम. ठाकुर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे अध्यक्ष/सचिव ग्राम पंचायत विहीरगांव, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती विहिरगांव (कन्हाळया) ता. लाखनी जि. भंडारा यांचेकडे श्री मारोती दामा जांभूळकर आणि इतर सर्व रा. विहीरगांव (कन्हाळया) ता. लाखनी, जि. भंडारा यांनी आपणाकडे दिलेल्या अर्जाची सत्यप्रत आपल्या स्वाक्षरीसह सांक्षाकित करुन, तसेच सदर प्रकरणातील निकालाची

रेकॉर्डनुसार सत्यप्रत ठराव व निकालासह सर्व सभासदांचे स्वाक्षरीनुसार आपल्या कार्यालयीन शील शिक्क्यासह प्रमाणित करुन वरील विषयानुसार वेळेचे आत अर्जदारास न चुकता मिळण्याची व्यवस्था व्हावी यासाठी या अर्जासह प्रपत्र अ मुद्रांकसह सादर केला आहे अशाप्रकारचे स्पष्टीकरण करुन माहिती मागितलेली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ताच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२३/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा निमंत्रक /पोलीस पाटील यांनी आयोगापुढे सांगितले की, तंटामुक्त समितीचे ते सचिव आहेत. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे ते सार्वजनिक अभिलेखे नाही. व त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. असे असले तरी त्यांच्याकडे सदरचा अर्ज हा पोहचला नाही तर सदरचा अर्ज हा ग्राम सेवक यांचेकडे दिला होता. व तो त्यांच्यापर्यंत प्राप्त झाला नाही. मात्र सदरची माहिती ही प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक भंडारा यांचे कार्यालयामध्ये पाठविण्यात आली होती. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि. २४/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती २ प्रतिमंध्ये संकलीत करुन पुरविण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. ही बाब अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केली आहे. परंतू अपीलकर्ता यांच्या म्हणण्यानुसार त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली म्हणून त्यांनी हा अर्ज ग्रामसेवक यांचेकडे दिला. तसेच तंटामुक्त समिती हे सार्वजनिक प्राधिकरण नाही. व अपीलकर्ता यांना ती माहिती पोलीस पाटील यांनी उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३३४/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मारोती सुकदेव नगराळे<br>शेडमाके वार्ड (सलीमनगर) वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर - ४४२९०७ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>भारत विद्यालय चारगाव (खुर्द)<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/१०/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/०६/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक भारत विद्यालय चारगाव (खुर्द) वरोरा, जि चंद्रपूर यांचेकडे सहाव्या वेतनाची सविस्तर माहिती दि. ०१/०१/२००६ ची वेतन निश्चिती दि. ०१/०१/२००६ ते ३०/०९/२००७ ची थकबाकी देयक वेतन बाबत चंद्रपूर येथे पाठविल्याची माहिती ज्या दिनांकास पाठविली ती तारीख, निवृत्तीवेतन सेवापुस्तक मंजुरीस पाठविल्यामुळे त्याची तारीख, याप्रकारे माहिती मागितलेली असून माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३.  अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि.२४/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना त्यांच्या तीनही मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक ०९/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. परंतू दि. २९/०७/२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी अपीलकर्ता यांना मागणी केलेल्या अर्जानुसार दस्तऐवजांसह या कार्यालयात त्वरीत संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. १३/०९/२०१० ला जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक भारत विद्यालय चारगाव यांना अपीलकर्ता यांनी थकबाकी कमी मिळण्याबाबत माहिती विचारलेली होती त्यासंबंधीत आपल्या कार्यालयातील थकीत क्लेम काढून तसा अहवाल शिक्षण विभागात सादर करावा असे माहिती अधिकारी शिक्षण विभाग (माध्य) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी कळविलेले दिसून येते. त्यानुसार अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.  अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांचे थकीत देयक व निवृत्ती वेतन वगैर सर्वच देयके काढण्यात आलेले आहेत. परंतू अपीलकर्ता हे उपस्थित न झाल्यामुळे त्यांना ते देता आले नाही. तरीही ती सर्व देयके त्यांना मिळालेली आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांना कार्यवाहीची अपेक्षा आहे परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे कोणत्याही प्रकारचे कार्यवाहीचे आदेश देता येत नाही. माहिती जशी आहे त्याच स्वरुपात ती उपलब्ध होते व तशीच ती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१.  अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १२९३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शहजाद महमुद अली<br>प्लॉट नं. ६, अलीगुलशन, जाफर नगर चर्च जवळ,<br>जाफर नगर पोस्ट-काटोल रोड, नागपूर -४४००१३ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (प्रशासन)<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महा. राज्य पुणे<br>औंध बॉडीगेट पुणे-४११००७ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महा. राज्य पुणे<br>औंध बॉडीगेट पुणे-४११००७ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांना विनंती अर्जानुसार सुनावणीची पुढील मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार सनावणी दि. २५/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली असून अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्राधिकृत पत्र जोडले असून त्यांच्या वतीने श्री नरेंद्र चव्हाण पोलीस निरिक्षक हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८.०४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष पोलीस माहनिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे कार्यालयामध्ये सन २००० ते २००७ या कालावधीतील माहिती मागितलेली असून त्यात निरीक्षणाच्या टिप्पणी व त्यावरील पूर्तता अहवालाच्या प्रती मिळणेबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १५/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि.२८/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. १ ते २ ची माहिती पुरविलेली नाही व मुद्या क्र. ३, ४ च्या संदर्भात अपूर्ण माहिती दिली अशी कारणे दिलेली आहेत. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. २९/०७/२०१० रोजी स्पीड पोस्टद्वारे अपीलकर्ता यांना काही माहिती पाठविण्यात आली आहे असे दिसून येते. परंतू त्यामुळेही समाधान न झाल्याने व त्यातही काही माहिती उपलब्ध न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना जी माहिती मिळालेली नाही ती खालीलप्रमाणे आहे.

१. दि. ०३/१०/२००१ ते ०५/१०/२००१ या कालावधीतील चंद्रपूर कार्यालयातील निरिक्षणाचा पूर्तता अहवाल मिळालेला नाही.

२. सन २००२ मधील एस. एम अली रिटायर्ड Dy. S.P. नागपूर यांचा निरिक्षण पूर्तता अहवाल मिळालेला नाही.

३. १५/०१/२००३ ते १८/०१/२००३ या कालावधीतील पूर्तता अहवाल मिळालेला नाही.

५. मुद्या क्र. ३ च्या संदर्भात एस.पी.एम.डी. २००० ते २००७ मध्ये निरिक्षण पूर्तता अहवालाच्या प्रती मिळालेल्या नाही. मुद्या क्र. ४ च्या संदर्भात दि. २०/१०/२००४ कॅम्प चंद्रपूर अन्वये पोलीस निरिक्षक मोटार परिवहन विभाग चंद्रपूर यांना दिलेल्या पत्राची प्रत मिळाली नाही .

त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या कार्यालयामध्ये प्रादेशिक कार्यालयातून निरिक्षण अहवालाच्या व पूर्तता अहवालाच्या प्रती पाठविल्या जातात. त्यासंबंधीत ॲण्टीकरप्शन ब्यूरो यांचेकडे सुध्दा त्या विभागाने सर्व माहिती पाठविलेली आहे. त्यामध्ये चंद्रपूर कार्यालयातील २००४ या वर्षातील निरिक्षण अहवाल पाठविण्यात आलेला दिसून येत नाही. परंतू अपीलकर्ता यांनी २००४ या वर्षातील निरिक्षण अहवालाच्या छायांकित प्रती त्यांना चंद्रपूर ACP कडून मिळाल्या आहेत हे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. त्यावरुन २००४ मध्ये निरिक्षण झाले आहे हे निश्चित. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, ज्या कारणासाठी लिपीकाकडे कागदपत्रे असतात त्यांच्या जबाबात हे सादर केले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या कागदपत्रांची उपलब्धता नाही असे कळविलेले आहे तरीही अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही. असे असल्याने अपीलकर्ता यांना विशेष पोलीस महानिरिक्षक मोटर परिवहन महाराष्ट्र राज्य पूणे यांच्या कार्यालयातील अभिलेखागारामधून संबंधित अभिलेख्यांचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध असल्यास छायांकित प्रतीत त्यांना उपलब्ध करुन घेता येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी विशेष पोलीस महानिरीक्षक मोटर परिवहन कार्यालय पूणे यांना कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी उपस्थित रहावे व संबंधित कागदपत्रांचे निरिक्षण करावे. निरिक्षणाअंती अपेक्षीत असलेल्या कागदपत्रांच्या छांयाकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना उपस्थित राहण्याचा वेळ व दिवस कळविल्यावर व उपस्थित झाल्यावर संबंधित प्रकरणातील संपूर्ण कागदपत्रे अपीलकर्ता यांना निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे. कागदपत्रांचे निरिक्षण करतांना

कार्यालयाचा जबाबदार अधिकारी उपस्थित असावा. व त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**मुख्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग मुंबई**
**० कॅम्प नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. मुख्य राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## <u>अपील क्र. १२९३/नाग/२०१०</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शहजाद महमुद अली<br>प्लॉट नं. ६, अलीगुलशन, जाफर नगर चर्च जवळ,<br>जाफर नगर पोस्ट-काटोल रोड, नागपूर -४४००१३ | - | **अपीलकर्ता** |
| | **विरुध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (प्रशासन)<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महा. राज्य पुणे<br>औंध बॉडीगेट पुणे-४११००७ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महा. राज्य पुणे<br>औंध बॉडीगेट पुणे-४११००७ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/१०/२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०४/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांना विनंती अर्जानुसार सुनावणीची पुढील मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार सनावणी दि. २५/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली असून अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्राधिकृत पत्र जोडले असून त्यांच्या वतीने श्री नरेंद्र चव्हाण पोलीस निरिक्षक हे उपस्थित आहेत.